www.esakal.com
सकाळ



डी. पी. भोसले कॉलेज ग्रंथालय कोरेगाव

# युवक जातीनिष्ठेच्या भिंती पाडतील

## डॉ. देवानंद शिंदे; कोरेगावमध्ये जिल्हास्तरीय युवा महोत्सवाचे उद्‌घाटन

**कोरेगाव, ता. २७ :** "मानवतावादाऐवजी प्रांतवाद पुढे येत असल्याच्या पार्श्वभूमीवर मानवतावाद प्रस्थापित करण्यासाठी युवा वर्ग निश्चितपणे योगदान देईल. युवा महोत्सवाच्या माध्यमातून युवक जातीनिष्ठ भिंती पाडू शकतील," असा विश्वास कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी व्यक्त केला.

शिवाजी विद्यापीठ व डी. पी. भोसले महाविद्यालयातर्फे आयोजित जिल्हास्तरीय युवा महोत्सवात ४० विविध महाविद्यालयांमधील ८२० स्पर्धकांनी भाग घेतला. या वेळी लोकसंगीत वाद्यवृंद, लोककला, लोकनृत्य, समूह गीत, समूह गायन, एकांकिका, लघुनाटिका, मूकनाट्य, नकला, वक्तृत्व, वादविवाद स्पर्धा, पथनाट्याचे सादरीकरण झाले. कुलगुरू डॉ. शिंदे यांच्या हस्ते महोत्सवाचे उद्‌घाटन झाले. अध्यक्षस्थानी रयत शिक्षण संस्थेचे सचिव प्राचार्य डॉ. भाऊसाहेब कराळे होते. या वेळी विद्यापीठ विद्यार्थी विकास विभागाचे संचालक प्रा. डॉ. आर. व्ही. गुरव, पंचक्रोशी शिक्षण मंडळाच्या अध्यक्षा




**कोरेगाव : युवा महोत्सवाच्या उद्‌घाटनप्रसंगी बोलताना डॉ. देवानंद शिंदे. शेजारी डॉ. भाऊसाहेब कराळे, डॉ. विजयसिंह सावंत, चित्रलेखा माने कदम, धनसिंग कदम.** **(शेखर रसाळ : सकाळ छायाचित्रसेवा)**

चित्रलेखा माने कदम, कोरेगाव एज्युकेशन सोसायटीच्या अध्यक्षा ॲड. सुनीता जगताप, आजरा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एम. एल. होनगेकर, देऊर महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष धनसिंग कदम, वाघोली महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वाय. बी. गोंडे उपस्थित होते.

डॉ. कराळे म्हणाले, "गरजांबरोबरच मनोरंजनालाही महत्त्व आहे. कलागुणांना संधी मिळाल्यास व्यक्तिमत्त्व विकास होतो. कलेमुळे मानवी जीवनाला वेगळी कलाटणी मिळू शकते. त्यामुळे युवकांनी कला गुण जोपासावेत."

प्राचार्य डॉ. विजयसिंह सावंत म्हणाले, "गेली अनेक वर्षे दुर्लक्षित राहिलेल्या ग्रामीण भागातील या महाविद्यालयाने अलीकडच्या काळात विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रात वेगळा ठसा उमटवला आहे."

डॉ. विद्या नावडकर, प्रा. बी. बी. मदने, प्रा. संगीता वीरकर यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. सचिन निकम यांनी आभार मानले.